# मेट्रो-३ मार्गावरील ट्रेन ऑगस्टमध्ये मुंबईत

## चाचणीसाठी तात्पुरता कारडेपो उभारण्यावर भर; अश्विनी भिडेंनी घेतला आढावा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अश्विनी भिडे यांनी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा पदभार स्वीकारल्यानंतर मेट्रो ३ साठी अनुकूल घटना घडली आहे. ऑगस्ट महिन्यात मेट्रो ३ ची पहिली ट्रेन मुंबईत दाखल होणार असून त्यानंतर या ट्रेनची चाचणी सुरु होईल. आरेतील मेट्रो कारडेपो वादापासून मेट्रो ३ प्रकल्प अडचणीत सापडला होता. ट्रेन येण्याशी विलंब झाला होता. भिडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रकल्पस्थळी जाऊन पाहणी केली आणि एकूणच कामाचा आढावा घेतला.

मेट्रो ट्रेनच्या चाचणीसाठी मरोळ - मरोशी येथे काही महिन्यांपूर्वीच तात्पुरता कारडेपो उभारण्याचे काम सुरु आहे. मात्र एकूणच या वादामुळे या कामावरही परिणाम झाला होता. परिणामी काम संथगतीने सुरु होते. आरेतील वादामुळे या ठिकाणी तात्पुरता कारडेपो उभारला जात आहे. मात्र त्या ठिकाणी फक्त ट्रेनची चाचणी होणार आहे. ट्रेनच्या चाचणीसाठी टनेल बांधण्यात आला आहे. ट्रेन बांधणीचे काम आंध्र प्रदेशात सुरु आहे. त्या ठिकाणी ट्रेन तयार झाली आहे. मात्र कारडेपोच नसल्याने ट्रेन आणून ठेवायची कुठे, चाचणी करायची कुठे, हा प्रश्न निर्माण झाला होता. भिडे यांनी या तात्पुरत्या कारडेपोवर लक्ष केंद्रित केले आहे.

त्यामुळे आता कारडेपो उभारणीच्या कामाला गती मिळणार आहे. येत्या दीड महिन्यात डेपो उभारण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. त्यांतर ट्रेन मुंबईत आणली जाईल. ट्रेन आल्यावर चाचणी सुरु होईल. या अवधीत कायमस्वरुपी कारडेपो आरेत उभारला जाणार की अन्यत्र, याचा अंतिम निर्णय होईल. तूर्तास तरी आरेतच डेपो उभारण्यावर नवे सरकार ठाम आहे. मात्र त्याचवेळी आरेतील कारडेपो विरोधात आंदोलक एकवटू लागले आहेत. हे आंदोलन किती तीव्र होते, यावर कारडेपोचे भवितव्य आहे.



मुंबई : मेट्रो - ३ च्या कामांनी वेग घेतला असून या मार्गावरील ट्रेन पुढच्या महिन्यात दाखल होईल.